# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**
पत्र क्र.रासेयो/२८३ / २०१८—१९
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१८

प्रति,

प्राचार्य, रा.से.यो. अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : गोवर रुबेला लसीकरण मोहिमेत सहभागी होण्याबाबत.**

मा. महोदय,

गोवर व रुबेला संसर्गाचे देशातून सन २०२० पर्यन्त संपूर्ण निर्मूलन करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. गोवर संसर्गामुळे भारतात लहान मुलांचे मृत्यु होतात. तसेच रुबेला विषाणूच्या संसर्गामुळे अर्भक मृत अथवा जन्मतः अपंग मूल जन्माला येतात. हे संसर्ग टाळयासाठी रुबेला लसीकरण मोहिम लक्ष गट वय वर्षे ९ महिने ते वय वर्षे १५ असे असून लसीकरण मोहीम सर्व शाळांमध्ये राबविली जाणार आहे.

या मोहिमेचा एक भाग म्हणून प्रचार व प्रसारासाठी तसेच सक्रीय मदत व्हावी यासाठी आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना द्वारे बहुमुल्य सहकार्य करावे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे अथवा ग्रामपातळीवर **आशा वर्कर्स** यांच्याद्वारे ही मोहिम कार्यान्वित होणार असून, यासाठी आपल्या रा.से.यो. स्वयंसेवकांमार्फत पथनाटय, भिंतीपत्रक, प्रदर्शन व याबाबत शाळेमध्ये जनजागृती करणे या कामी मदत करावी.

आपला विश्वासू ,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग